सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**


मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली (पूर्व ) मुंबई

यांचे कार्यालय

Tel. 28860362 Email- sgnpmumbai@gmail.com


# संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, मुंबई वनविभागासाठी कंत्राटी पध्दतीने निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी यांच्या नियुक्ती करिता जाहिरात

निसर्ग माहिती केंद्र संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथे निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी (Education & Extension Officer) यांची कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करणे प्रयोजित आहे. त्या करीता इच्छुक उमेदवार यांचे सीलबंद अर्ज मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उदयान, बोरीवली, मुंबई याचें नावे दि. ०८/०६/२०१७ पासून ते १७/०६/२०१७ पर्यंत कार्यालयीन वेळेत मुख्य वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली, मुंबई यांचे कार्यालयात स्वीकारले जातील.

| | |
|---|---|
| पद | निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी (Education & Extension Officer NIC) |
| पदसंख्या | ०१ |
| मानधन | रु. २५,०००/- दरमहा |
| पात्रता | १. अर्जदार विज्ञान शाखेचा मास्टर्स डिग्री धारक असावा.वनस्पती शात्र, प्राणीशात्र किंवा पर्यावरण शास्त्र या शाखेस प्राधान्य दिले जाईल.<br>२. राष्ट्रीय उदयानाबद्दल व निसर्ग विषयक सखोल माहिती असावी.<br>३. उत्कृष्ट संभाषण कौशल्य असावे.<br>४. संगणक हाताळण्याचे कौशल्य असावे.<br>५. सदर क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य दिले जाईल. |
| मुलाखत | अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची मुलाखत मुख्य वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे कार्यालयात दि. २०/०६/२०१७ रोजी ११.०० वा समिती मार्फत घेण्यात येईल. |

टीप:- ही शासकीय नोकरी नसून केवळ कंत्राटी पध्दतीवर ११ महिन्यांच्या करारावर नियुक्ती आहे.

शैक्षणिक अर्हता, अनुभव, कर्तव्य, जबाबदारी, मानधन, नियुक्ती कालावधी, बंधपत्र, अर्जाचा नमुना, निवडीची पध्दत इ. सविस्तर तपशील **WWW.mahaforest.gov.in** व **www.sgnp.maharashtra.gov.in** या वेबसाईट वर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी सदर तपशील पाहून अर्ज करावे.आवश्यक वाटल्यास या विभागाशी संपर्क साधावा.

सही/-
मुख्य वनसंरक्षक व संचालक,
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,
बोरीवली.

# महाराष्ट्र शासन

## वन विभाग

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली (पूर्व), मुंबई-४०० ०६६

## जाहिराती विषयी अधिक माहिती

निसर्ग माहिती केंद्र संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथे निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी ( Education & Extension Officer)यांची कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करणे प्रयोजित आहे. त्या करीता इच्छुक उमेदवार यांचे सीलबंद अर्ज मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उदयान, बोरीवली, मुंबई याचें नावे दि. ०८/०६/२०१७ पासून ते १७/०६/२०१७ पर्यंत कार्यालयीन वेळेत मुख्य वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली, मुंबई यांचे कार्यालयात स्वीकारले जातील.

**A) कामाचे स्वरुप: -**

१) नेचर ट्रेल/ट्रेक साठी Naturalist ( निसर्ग निर्वाचक)म्हणुन काम करणे.

२) निसर्ग माहिती केंद्र येथे आयोजीत करावयाचे वर्षाचे Event Calender तयार करणे व त्याचे नियोजन करणे

३) निसर्ग माहिती केंद्र मधिल आयोजित करण्यात येणारे विविध Events इत्यादी चे आयोजन करणे व ते कार्यक्रम पार पाडणे

४) शाळा, महाविदयालये ,कॉर्पोरेट ऑफिसेस यांचेशी संपर्क साधुन जास्तीत जास्त व्यक्तींना निसर्ग माहिती केंद्र उपक्रमामध्ये सामील करणे. व निसर्ग माहिती क्रेंद्राच्या महसुलात वाढ करण्यासाठी प्रयत्न करणे.

५) संजय गांधी राष्ट्रीय उदयानाची वेबसाईट, फेसबूक पेज इत्यादी अपडेट करणे व निसर्ग माहिती केंद्राचा ईमेल हाताळणे व इतर संगणक विषयक कामे.

**B) पात्रता**

१) अर्जदार विज्ञान शाखेचा मास्टर्स डिग्री धारक असावा.वनस्पती शात्र, प्राणीशात्र किंवा पर्यावरण शास्त्र या शाखेस प्राधान्य दिले जाईल

२) अर्जदाराने निसर्ग निर्वाचक अथवा निसर्गप्रेमी संस्थेमध्ये काम केलेले असल्यास त्यास प्राधान्य दिले जाईल अनुभव प्रमाणपत्र सोबत सादर करावे.

३) संगणक हाताळण्याचे कौशल्य असावे.

४) राष्ट्रीय उदयानाबद्दल सखोल माहिती असावी.

५) संजय गांधी राष्ट्रीय उदयानामार्फत आयोजित विविध संशोधन, संवर्धनात्मक कार्यक्रमामध्ये व निसर्ग शिक्षण विषयक कार्यक्रमांमध्ये हिरीरीने सहभाग घेतला असल्यास त्यास प्राधान्य देण्यात येईल.

६) उत्कृष्ठ संभाषण कौशल्य असावे.

**C) मानधन :** महिन्याला रुपये २५,०००/-(रु. पंचवीस हजार) इतके मानधन अदा करणेत येईल.

**D ) मुलाखत** :अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची मुलाखत मुख्य वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे कार्यालयात दि. २०/०६/२०१७ रोजी ११.०० वा निवड समीती मार्फत घेण्यात येईल. उमेदवाराची निवड मुख्यत्वे मुलाखतीच्या आधारावरच निवड केली जाईल

**E ) महत्वाची सुचना;**

१) कोणतेही कारण न देता नेमणूक नाकारण्याचा पूर्ण् अधिकार निवड समीतीकडे राहील त्याबाबत दाद मागता येणार नाही.

२) एखादया अर्जदाराच्या बाबतीत निकष शिथील करण्याचा अधिकार निवड समीती अध्यक्षांचा राहील.

३) निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी यांची निवड कंत्राटी पध्दतीने ११ महिने इतक्या कालावधीसाठी राहिल. तथापि त्यांनी सदर कालावधीमध्ये उत्कृष्ठ काम केल्याचे त्यांच्या कामाच्या मुल्यमापनाअंती स्पष्ट झाल्यास त्याना मुदतवाढ देखील मिळु शकेल.